Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए,
फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी
शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

जा.क्र.रा.म./परीक्षा-३/ ५८८३
दिनांक-१७/१०/२०२२

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा.संचालक,दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई-४०००३०
४) मा.संचालक,आकाशवाणी,मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०००२०
५)मा.संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तपत्र/ वृत्तवाहिन्या

**विषय-** फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देणे व चलन Download करून बॅंकेत शुल्क भरण्याच्या व प्रि–लिस्ट, विद्यार्थी यादी जमा करणेच्या तारखांबाबत.

महोदय,

मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या इ.१२वी च्या परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखांना मुदतवाढ देणेबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी त्यांच्या वृत्तपत्रात प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

(अनुराधा ओक)
**सचिव**
**राज्य मंडळ, पुणे ०४.**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण त्यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे. व सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे ३) अस्वीस, सस्वीस, राज्यमंडळ, पुणे ४) ऑनलाईन विभाग

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई-४०००३२
३) मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्त कार्यालय, पुणे ४११००१.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे–४११००४

### ।। प्रकटन ।।

**विषय-** फेब्रुवारी–मार्च **२०२३** मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देणे व चलन **Download** करून बँकेत शुल्क भरण्याच्या व प्रि–लिस्ट,विद्यार्थी यादी जमा करणेच्या तारखांबाबत.

संदर्भ :– क्रमांक : रा.मं./परीक्षा–३/५४८२, दि.२९.०९.२०२२ चे परिपत्रक.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या नियमित विद्यार्थ्यांची www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र **(Enrollment Certificate)** प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी **(Private Candidate)**, तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, **ITI** (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे **Transfer of Credit** घेणारे विद्यार्थी) चे विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणारे विद्यार्थी यांची परीक्षा आवेदनपत्रे दि.२२.१०.२०२२ पासून ऑनलाईन भरण्यास सुरू होत आहेत.

नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याची मुदत दि.२१.१०.२०२२ रोजी समाप्त होत आहे.सदर आवदेनपत्रे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

| उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत **शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची फक्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Databaseवरुनऑनलाईन पध्दतीने नियमित शुल्काने भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा.** |
|---|
| १ |
| शनिवार दि.२२.१०.२०२२ ते शनिवार दि.०५.११.२०२२ |

संदर्भांकित परिपत्रकामध्ये बँकेत शुल्क भरण्याच्या तारखा नंतर कळविण्यात येतील असे कळविले होते त्यानुसार नियमित व एम.सी.व्ही.सी.चे विद्यार्थी सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी,तुरळक विषय ,आय.टी.आय. विषय घेणारे, श्रेणीसुधार व खाजगी इत्यादी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे सादर केल्यानंतर बँकेत शुल्क भरण्याच्या चलनासह **विद्यार्थ्यांच्या याद्या** व प्रिलिस्ट जमा करावयाच्या तारखा खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

| उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन **Download** करून शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क **RTGS/NEFT** द्वारे भरणा केल्याच्या पावती/ चलनासह **विद्यार्थ्यांच्या याद्या** व प्रिलिस्ट जमा **करावयाची तारीख** |
|---|---|
| १ | २ |
| बुधवार दि. १९.१०.२०२२ ते बुधवार दि. ०९.११.२०२२ | शुक्रवार दि.११.११.२०२२ |

अ) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क RTGS द्वारे भरणा केल्याच्या **RTGS/NEFT** पावती/ चलनासह **विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट जमा करावयाची तारीख** शुक्रवार दि.११.११.२०२२

ब) सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कॉलेज Login मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून आवेदनपत्रात नमूद केलेली सर्व माहिती जनरल रजिस्टरनुसार पडताळणी करून अचूक असल्याची खात्री करावी.सदर प्रिलिस्टवर माहितीची खात्री केल्याबाबत संबंधीत विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर प्रिलिस्ट परीक्षा फी चलन व विद्यार्थी यादीसोबत विभागीय मंडळाकडे निर्धारित कालावधीत जमा करावी.

खालील तपशीलाप्रमाणे विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क खाली नमूद केलेल्या बॅकेमध्ये RTGS द्वारे भरणा करुन चलनाची प्रत तसेच विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

१. पुणे, औरंगाबाद व कोल्हापूर :– **Bank of India Virtual Account**
२. मुंबई, नागपूर व लातूर :– **HDFC Bank Virtual Account**
३. अमरावती, नाशिक व कोकण :– **AXIS Bank Virtual Account**

१ आवेदनपत्रे सादर केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क संगणकीय चलन **Download** करुन चलनावरील **Virtual Account** मध्ये **NEFT/RTGS** व्दारे भरावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी **NEFT/RTGS** द्वारे भरणा केलेली रक्कम त्यांच्या बॅक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच **Account Number** व **IFSC Code** चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

२. कनिष्ठ महाविद्यालयांनी सादर केलेल्या सर्व आवेदनपत्रांचे विहित परीक्षा शुल्क भरल्याशिवाय संबंधितांचे प्रवेशपत्रे उपलब्ध करुन दिली जाणार नाहीत याची सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांनी नोंद घ्यावी.

३. कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण व अचूक शुल्क भरल्याची खातरजमा विभागीय मंडळस्तरावर करुन त्याबाबतचा अहवाल गणकयंत्र विभागाच्या नमून्यात राज्यमंडळ कार्यालयास सादर केल्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ऑनलाईन पध्द्तीने उपलब्ध करुन देण्यात येतील.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

दिनांकः– १७/१०/२०२२